Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

Original Article

# डॉ. कृष्णा इंगोले यांच्या लोकगीतातून दिसणारी स्त्री

**कु. यादव नयना नारायण[1], प्रा. डॉ. सुवर्णा सुखदेव गुंड[2]**
[1]संशोधक विद्यार्थीनी, मु. पो. खंडाळी, ता. माळशिरस
[2]संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख,
माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर
ई-मेल: pataleavinash5@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180431
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(A)
Pp 159-162
April- 2026
**Submitted:** 26 Mar. 2026
**Revised:** 30 Mar. 2026
**Accepted:** 20 Apr. 2026
**Published:** 30 April. 2026

***सारांश : -***

*मराठी लोकसाहित्याच्या सर्वच प्रकारामधून समाजाचे अंतरंग, समाजाची भावना, लोकांच्या समजुती व चालीरीती, लोकांची संस्कृती इ. गोष्टीचे उत्स्फूर्त दर्शन लोकसाहित्यामधून घडते. महाराष्ट्राची लौकिक परंपरा मराठी लोकसाहित्याच्या वैशिष्ट्यपूर्ण मराठी भाषेतून व्यक्त झाल्याचे आढळते. दु:खावर सौंदर्याची हळुवार फुंकर घालणारे हे साहित्य आहे. लोकसाहित्याचा प्रांत लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार, उखाणे, कोडी, जात्यावरच्या ओव्या, गीते, खेळांची गीते यांनी समृध्द आहे. लोकगीताचा विचार केला तर स्त्रीयांचे भावविश्व या गीतांनी व्यापलेले दिसते. दळण-कांडण, सडा-सारवण, शेतातील कामे, बाळाला जोजावणे, नागपंचमी सणाची फेराची गीते, व्रतवैकल्य संबंधित लोकगीतांतून आपल्या भाव-भावनांना वहिवाट करून देतात. माणदेशी लोकसाहित्याला वैभवशाली परंपरा आहे. डॉ. कृष्णा इंगोले यांनी आपल्या लोकसाहित्यातून माणदेशी लोकजीवन लोकसंस्कृतीतीला अजरामर केले आहे. त्यांच्या लोकगीतातून स्त्रीचे चित्रण कसे आले आहे. याचा शोध या शोधनिबंधाद्वारे घेणात येणार आहे.*

**प्रस्तावना : -**

लोकसंस्कृतीचे साक्षेपी अभ्यासक म्हणून डॉ. कृष्णा इंगोले यांना महाराष्ट्रात ओळखले जाते. लोकसाहित्य हा त्यांच्या व्यासंगाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे. लोकसाहित्याच्या आस्थेतूनच माणदेशी स्त्रियांच्या ओवीगीतांचे संकलन केले. अत्यंत परिश्रमपूर्वक माता-भगिनींकडून ही स्त्रीगीते संकलित केली. सुमारे आठ वर्ष गीत संकलन करून त्यातील निवडक ओवीगीते एकत्र करून त्यावर थोडे भाष्य करून ते लेखन सलग प्रसंगातून जोडून लेकीच्या जन्मापासून ते तिच्या अहेव मरणापर्यंतचा जीवन प्रवास रेखाटून 'लोकसंस्कृतीतील स्त्री रूपे' हा ग्रंथ लिहिला आहे. तर नियतकालीकातून काही परीक्षणात्मक लोकसाहित्यावर केलेले लेखन एकत्र करून कोरोनाच्या कालखंडात 'लोकवाणीतील अमृतधन' या ग्रंथाची निर्मिती कली आहे. या दोन्ही ग्रंथामधून डॉ. कृष्णा इंगोले यांनी विशेषत: स्त्रीजीवनाचे भावसंबंध मुखरीत केले आहेत. स्त्रियांच्या जगण्यातील एक अनोखा आलेख या लोकगीतातून रेखांकित झाला आहे.

**स्त्रीगीताच्या निर्मिती प्रेरणा : -**

लोकसाहित्यात लोकगीतांची संख्या विपुल असून त्यात स्त्रियांनी स्त्रियावर रचलेल्या स्त्री गीताचे प्रमाण जास्त असल्याचे डॉ. कृष्णा इंगोले निरीक्षणातून नोंदवताना दिसतात. स्त्रीगीताची प्राचीनता पाहताना त्यांनी वेदकाळापासूनच्या वाङमयापासूनच्या वाङमयाचा आढावा घेतला आहे. स्त्रीगीताच्या निर्मितीप्रेरणा या गरजेतून निर्माण झाल्याचे दिसते. स्त्रीगीतातून एखादी ओवी त्याकाळातील इतिहासावरही प्रकाश टाकू शकते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
***कु. यादव नयना नारायण*** *संशोधक विद्यार्थीनी, मु. पो. खंडाळी, ता. माळशिरस*

**How to cite this article:**
*यादव. नयना. नारायण. & गुंड, सुवर्णा. सुखदेव. (2026). डॉ. कृष्णा इंगोले यांच्या लोकगीतातून दिसणारी स्त्री. Journal of research & development, 18(4(A)), 159–162. https://doi.org/10.5281/zenodo.20422438*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20422438
OPEN ACCESS

**"महादेवाच्या पिंडीवरती ।**
**बेल वाहिला शिळाताजा ।**
**पुत्र मागूनी गेला राजा ।"**

वरील ओवीतून उल्लेख केलेला 'राजा' हा शहाजी महाराज असावेत कारण ती शिंगणापूर परिसरातील ओवी आहे. स्त्रीगीतांच्या निर्मितीप्रेरणा शोधल्या तर त्या विविध प्रकारच्या दिसून येतात. पूर्वीच्या स्त्रियांना आपल्या कुटूंबामध्ये प्रचंड काबाडकष्ट करावे लागत असे, अगदी पहाटे जेंव्हा आकाशात शुक्राची चांदणी उगवल्यापासून तिच्या कष्टाला सुरूवात असे.पहाटेच्या वेळी कोंबडा आरवला सुरूवात झाली की जात्यावर दळायला बसावे लागे. जात्यावरील दळणाचे प्रचंड कष्ट कमी करण्यासाठी जात्याला उद्देशून ती म्हणते -

**"जात्या तू ईश्वरा । कुण्या डोंगराचा ऋषी ।**
**बया मालनीसारखं । हुरद उकललं तुझ्यापाशी ।"**

स्त्री आपल्या मनातील हितगुज ओव्यामधून या जात्यावर दळताना व्यक्त करताना दिसते. स्त्रीलोकगीतातून स्त्रियांचे मनोरंजन होत असे. तसेच अनौपचारिक शिक्षण मिळत असते. स्त्री जातीचे युगानुयुगाचे संचित ती आपल्या गाण्यातून व्यक्त करताना दिसते. आपला भरतार जर रागवाला असेल तर तो राग त्याच्या डोळयात पारखावा, आणि तो कसा घालवायला हवा या विषयी ती म्हणते

**"रूसला भरतार । रूसला तर रूसू द्यावा ॥**
**सांगते सये तुला । शेजेवरी समजवावा ॥"**

स्त्रियांनी कसं वागावं, बोलावं, भरल्या बाजारात दंडभुजा झाकून, खाली बघून चालावे, जोडवी वाजू देऊ नयेत. डोईवरचा पदर काकणाच्या खाली नखापर्यंत असावा. लेकीनं सासरी नांदून आपल्या आई-बापाचं नावं मोठं करावं अशी नितीमत्तेची शिकवण ही ती आपल्या गीतातून मांडताना दिसते.

**"हासू नको नारी । हसणं कोण्या परकाराचं ॥**
**उतरेल पाणी । तुझ्या चातुर भरतारचं ॥"**

स्त्रियांच्या फेरगीतातून समुहभावना वाढीस लागून स्नेहभावना व्यक्त करते. या स्त्रिलोकगीतातून विवाहसंस्था, कुटूंबसंस्था याचे समर्थन करताना दिसते. कधी सामाजिक निषेध ही व्यक्त करते -

**"काय भाळलीस गोरे । शेजारच्या फाकड्याला**
**चटणी मिळंना तुकड्याला ।"**

स्त्रिया आपल्या लोकगीतातून सासर-माहेर विषयीच्या भावना व्यक्त करतानाचे चित्रण दिसून येते. दु:खही तिच्या जीवनाला व्यापून टाकणारी गोष्ट आहे. ती स्त्री असल्याकारणाने गौण आणि हीन लेखली जाते. सासुरवाशीणाचा छळ तर अगदी जीवघेणा आणि हे दु:ख दुसऱ्याला सांगायची पंचाईत.

**"साळूला सासुरवास । दिरा नंदानी तिला केला ॥**
**बया माझ्या मालनीचा । काट्यावरी जलम गेला ॥"**

असा हा शाररिक, मानसिक छळ तिच्या मरणाबरोबरच संपतो. सासुरवास हा कुटूंबव्यवस्थेला लागलेला कलंक. या लोकमानस लोकगीतातून ती आपलं दु:ख व्यक्त करते. सासु-सासऱ्याबरोबर तिला नवऱ्याचाही धाक असे. तिला रागवून, शिवीगाळ करून, प्रसंगी, मारहाण करून बायोकाला धाकात ठेवले जाई. परंतु नवरा जरी रागीट असला तरी त्याची माया पिकल्या सीताफळासारखी आहे असे ती म्हणते -

पिकलं सीताफळं । हिरवी त्याची काया ॥ रागीष्ट भरताराची ॥ पोटात त्याची माया ॥

**स्त्रियांच्या भूमिकेने मांडलेले स्त्रीजीवन : -**

डॉ. कृष्ण इंगोले यांच्या लोकगीतातील स्त्री आपल्या जीवनाकडे आपल्या अनुभवाने, भूमिकेने पाहते. जे जीवन अनुभवले पाहिले तेच आपल्या गीतातून गायले आहे. रामायणातील सीतेमध्ये ती आपले प्रतिनिधिक रूप पाहते. पती रामासाठी वनवास स्वीकारणारी, रावणाच्या वीट दृष्टीला बळी ठरलेली, संशयामुळे चारित्र्य हनन होणारी अग्निदिव्याला सामोरी जाणारी सीता स्त्रियांना आपलेच रूप वाटते -

**"राम या म्हणून राम । राम न्हाई सीतेच्या तोलाचा ।**
**हिरकणी माझी सीतामाय । राम हलक्या दिलाचा ॥"**

स्त्रियांचे विश्व मर्यादित होते आणि त्या पुरषी गुलामगिरीत आपल्या जीवन जगत होत्या. पुरूषी व्यवस्थेमुळे त्याची एक मानसिकता तयार झाली होती. पण तिच्या जीवनाचे बारकाईने निरीक्षण केल्यास आपल्या जीवनाकडे आपल्या भूमिकेतून पाहताना दिसते.

**"लेकीच्या आईला । नका म्हणू हालकी ॥**

**लेकाच्या आईला । कुणी दिलीया पालखी ॥"**

अशी भूमिका घेताना ती दिसते. पुरूषदेवांची गाणी गाताना ती त्या देवाच्या संबंधित स्त्रियांच्या अनुषंगानेच गाताना दिसतो. उदा. शंकराच्या गीतात गिरजा, बिरोबाच्या गीतात कामाबाई व मायीबाई येते. ही सगळी तिची भूमिका पारंपारिक स्त्रीवादीच होती.

**स्त्रीगीतातून लोकसंस्कृती दर्शन : -**

स्त्रियांनी आपल्या आचरणातून लोकसंस्कृती, धर्म-व्यवस्था टिकवून धरली आहे. यामध्ये अनेक देवदेवता, पुजाविधी, रूढी-परंपरा, समजुती, सणसमारंभ, श्रध्दा, निष्ठा यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. डॉ. कृष्णा इंगोले यांच्या मते, लोकधर्माचा सारा बाज स्त्रीगीतांतून येतो. लोसंस्कृतीचे दर्शनही त्यातून घडते. यादृष्टीने स्त्रीगीते महत्त्वाची ठरली आहेत. स्त्रीच्या आयुष्यात पंचमीच्या गौरी-गणपती, भाऊबीज, दिवाळी सणाला फार महत्त्वाचे स्थान असते. नुकतीच लग्न झालेली सासुरवाशीण पंचमीच्या सणाची वाट पाहत असते. या सणाला माहेरी यायची फार ओढ असते.

**"सणामंदी सण । आली पंचीम खेळायची ॥**

**माझी ती मैनाबाई । वाट बघती मुराळ्याची ॥"**

मोठ्या आतुरतेने ती भाऊरायाची वाट पाहत असते. भारतीय संस्कृतीत फार पूर्वीपासून नागपूजा केली जाते. नागराज हा स्त्रीचा भाऊ म्हणून लोकसंस्कृतीत पूजतात.

पंचमीच्या सणाला। नागाला दुधलाह्या॥ आऊख मागुया भाऊराया ॥

श्रावण महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी गौरीपूजा केली जाते. मंगळवाराची म्हणून तिला मंगळागौर म्हणतात. स्त्रियांच्या दृष्टीने मंगळगौर महत्त्वाचा सण-उत्सव या स्त्रिया तिची पूजाअर्चा, उपवास, खेळगाणी मोठ्या प्रमाणावर म्हणतात.

**"ये गं, ये गं गवराबाई**
**अंगणी तापीत दूध**
**दूधा पिवळी साई**
**लेकी गवरा बाई ।"**

लोकपरंपरेतील स्त्रियांच्या मनोरंजनाचे, आनंदाचे हे भावविश्व आपण जपायला हवे. दिवाळीतील भाऊबीज स्त्रियांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची असते. भाऊबीज म्हणजे बहीण-भावाचे उदात्त प्रेमाचं प्रतीक, भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य दसरा संपला की या माहेरवाशीणीला माहेरची ओढ लागते. माहेराच्या वाटेकडे ती डोळे लावून मुराळ्याची वाट पाहते.

**"दिवाळी भाऊबीज । भावा-बहिणीच्या सण ॥**

**सावळया बंधुराया । येती तुझी आठवण ॥"**

भाऊबीजे संबंधीचे हे सांस्कृतिक भावविश्व या स्त्रीगीतातूनच प्रकटते. धार्मिक व पौराणिक स्वरूपाच्या स्त्रीगीतातून पंढरीचा विठ्ठल, वारकरी संप्रदाय, संतमहं याच्या गीतात ती मानवी भावभावनांचा दैवतांच्या जीवनकथावर आरोप करून गाते -

**"रूक्मिणी धुणं धुती । विठ्ठल खडकावर बसं ॥**

**दोघांच्या पिरतीचे । चंद्रभागेला आलं हासं ॥"**

**सामाजिक स्त्रीगीतातील स्त्री : -**

पूर्वीच्या स्त्रीचे जीवन मर्यादित स्वरूपाचे असल्याने त्यातून प्रगट होणारी सामाजिकता मर्यादित स्वरूपाची जाणवते. सुतार, शिंपी, कुंभार, सोनार, कासार इ. जातींच्या माणसाशी स्त्रियांचा संबंध व्यवहाराच्या निमित्ताने येत होता. शिंप्याकडे चोळी शिवणे, सोनाराकडे दागिणे घडविणे, कासाराकडून बांगड्या भरणे या सर्व जातीजमातीचा उल्लेख स्त्रीगीतातून येतो.

**"वैराळ दादा । तुझी माझी कोण जात ॥**

**चुड्याकारन दिला हात ॥"**

तिच्या या गीतातून जातीय संघर्षाचे चित्र न येता उलट सामंजस्याचे चित्रण येते. जातीयता वाईट आहे अशी भावना तत्कालीन स्त्रियांमध्ये निर्माण झालेली दिसत नाही. मुलगी म्हणजे परक्याचे धन तिला लहानाची मोठी करावी लागते. शिक्षणासाठी खर्च करावा लागतो. मग लग्न करताना हुंडा देण्याची प्रथा त्या काळात मोठ्या प्रमाणात जाणवते. आजही ती काही ठिकाणी वेगळ्या स्वरूपात पाहयला मिळते. परंतु आता मुलांना लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याने मुलग आणि नारळात गोड मानून घेणारा समाज आज आपणाला पाहयला मिळतो.

**"नवरीचा बाप । हिंडतो घरोघर ॥**
**बिन हुंड्याचा नाही वर ।**
**बोलवु आपल्या राणी । कर्ज काढू शेतावर ॥"**

हुंड्याच्या चालीचा, शेतावर कर्ज काढून लग्न करून देण्याचा अनुभव स्त्री आपल्या ओवीगीतातून व्यक्त करते. यातून सामाजिकता प्रकट झालेली पाहयला मिळते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

डॉ. कृष्णा इंगोले हे माणदेशी लेखक असल्याने माणदेशाची वैशिष्ट्ये, लोकजीवन चित्रित करणारी स्त्री माणदेशातील लोकगीतातून दिसते. भल्या-भल्या विद्वांना न जमणारे माणदेशाचे वर्णन करताना या स्त्रिया आढळतात.

**"असं माणदेशाचं ऊन । तिथं चरती मेंढर खिलारं ॥**

**जशी तळपती तलवार । हो तळपती तलवार ॥"**

डॉ. कृष्णा इंगोले यांच्या ओवीगीतातील स्त्री आपल्या जीवनाअनुभवाचे सार व्यक्त करताना दिसते. याविषयी लोकसाहित्य अभ्यासक डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात. ओवीगीते समजून घेण्याची इंगोले यांची अविरत धडपड, त्यामागील सांस्कृतिक संबंध उलगडून सांगण्याची हातोडी आणि ओवीगीतांच्या आकलनातून प्रत्ययाला येणारे सामाजिक वास्तव अशा अनेक गोष्टींचे अत्यंत साक्षेपी विवेचन डॉ. इंगोले यांनी ग्रंथीत केले आहे.

**समारोप : -**

डॉ. कृष्णा इंगोले यांच्या लोकगीतातून स्त्रीजीवनाचे चित्रण मोठ्या प्रमाणात आले आहे. या लोकगीतातून प्रगटलेली स्त्री ही श्रध्दाळू, मोठ्यांचा आदर करणारी, सहनशील सोशिक आहे. तसेच सासरचे दु:ख व माहेरची ओढ, पतीबद्दलचा प्रेमभाव, व्यक्त होणाऱ्या स्त्री मनाचे चित्रण झालेले दिसते. ते या स्त्रियांच्या भावनाविषयी मत व्यक्त करताना म्हणतात. स्त्री गीतातील सर्व शब्दकळा ग्रामीण बोलीतील आहे. तिचे सौंदर्य 'फेअर अँण्ड लव्हली' नसले तरी त्यात अस्सल गावरान गोडवा, सतेजपणा, सहनतेतील अनघड सौंदर्य असते.

**निष्कर्ष : -**

1) डॉ. कृष्णा इंगोले यांनी लोकसाहित्याच्या आस्थेपोटी माणदेशी स्त्री ओवीगीतांचे संकलन केले आहे.
2) स्त्रियांच्या लोकगीतात स्त्रीचे माहेर-सासर, नातेसंबंध देवदेवता याविषयीच्या भावना दिसून येतात.
3) डॉ. कृष्णा इंगोले यांच्या लोकगीतातून स्त्रीच्या संवेदनशील श्रध्दाळू, प्रेमळ मनाचे दर्शन घडते.
4) स्त्रियांची ही लोकगीते श्रमपरिहार, आत्माविष्कार, मनोरंजन, आनंद, लोकशिक्षण सारख्या प्रेरणातून निर्माण झाली.
5) डॉ. कृष्णा इंगोले यांच्या लोकगीतांमधून विवाहसंस्था, कुटूंबसंस्था या समाजमान्य संस्थाना समर्थन मिळते.
6) या स्त्रीगीतातून ती सामाजिक निषेधही नोंदवते.

**संदर्भ ग्रंथ : -**

1) लोकवाणीतील अमृतधन - डॉ. कृष्णा इंगोले
2) लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे - डॉ. कृष्णा इंगोले
3) कृष्णाक्षर - संपा. डॉ. अरूण शिंदे
4) लोकवाणीतील अमृतधनाचा रसाळ परिचय (लेख) - भरत यादव, दैनिक, आरंभ मराठी मध्ये प्रकाशित